❊ प्रकरण १ ले ❊

# विषयप्रवेश

## ❋ प्रकरण १ ले ❋

# विषय प्रवेश

प्रबंधिकेच्या या पहिल्या प्रकरणात काव्य म्हणजे काय, भावकविता म्हणजे काय या मुद्दयांच्या अनुषंगाने काही चर्चा करावयाची आहे. तसेच मराठी काव्यप्रवासाच्या ज्या वळणावर ग्रेस यांची कविता निर्माण झाली तत्पूर्वीची मराठी कवितेतील वळणे स्थूलमानाने पहावयाची आहेत. प्राचीन कविता ते ग्रेसपर्यंतची कविता, असा जो मराठी कवितेचा प्रवास झाला आहे त्या प्रवासाचा धावता आढावा घ्यावयाचा आहे.

ध्वनीची पर्यायाने भाषेची निर्मिती काव्यरूपाने झाली हा विचार स्पष्ट करताना डॅनिश भाषाशास्त्रज्ञ ऑटो येस्परसन याने 'प्रेमगानमूलक सिध्दांत' मांडला. आदी काळातील सर्वच वाङ्मय पद्यमयच होते. वेद, उपनिषदे, पुराणे इ. काव्यरुपात आहेत. श्रुती, स्मृती, महाकाव्यापासून ते मराठी आदयग्रंथ विवेकसिंधू, ज्ञानेश्वरीपर्यंतचे सर्वच वाङ्मय पदयरुपातच आहे. आदीकाळापासून काव्याने मानवी संस्कृती, धर्म, कला, तत्वज्ञान, शास्त्र अध्यात्म इ.सर्वच क्षेत्रे व्यापली आहेत. जोपर्यंत गदयवाङ्मय स्वतंत्रपणे आकारास आले नव्हते, तोपर्यंत कविता म्हणजे साहित्य हा विचार सर्वमान्य होता. संस्कृत साहित्यशास्त्रातही साहित्य म्हणजे काव्य या संकल्पनेला केंद्रस्थानी मानूनच साहित्यमीमांसा झाली आहे.

काव्य म्हणजे साहित्य ही संकल्पना इतकी व्यामिश्र आहे की तिची सर्वसंमत अशी व्याख्या करणे, अशक्य आहे. अनेक साहित्यिकांनी काव्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला साहजिकच या व्याख्येतून व्यक्तिसापेक्षता येणे अपरिहार्य आहे.

'काव्य म्हणजे 'शब्द' आणि 'अर्थ' याचे साहचर्य होय' असे भामह व रुद्रट यांनी सांगितले. तर 'रसपूर्ण वाक्य म्हणजे काव्य' असे विश्वनाथ म्हणतो. 'रमणीय अर्थ प्रतिपादन करणारे शब्द म्हणजे काव्य' असे जगन्नाथ पंडित म्हणतो -

'A poem is a spontaneous overflow of powerful emotions'

असे वर्डसुवर्थ कवितेचे वर्णन करतो.

या व्याख्या विचारात घेताना आपणास असे जाणवते की प्राचीन काळी

सर्वच जनजीवन, जीवन-व्यवहार, धर्म, श्रध्दा, नीतीमूल्ये ही तत्वाने भारलेलीच होती आणि काव्य हेच त्या काळातील आत्माविष्काराचे एक सहज माध्यम होते. जेव्हा गद्य अस्तित्वात आले तेंव्हा मानवी जीवन-व्यवहार गद्याने व्यापले गेलेत. 'लीळाचरित्र' या आदय गद्य ग्रंथापासून मराठी गद्यवाङ्मय सुरु झाले आणि साहित्यात 'गद्य' आणि 'पद्य' हे दोन प्रमुख प्रकार निर्माण झाले. असे असले तरीही कविता हा एक मूलभूत वाङ्मय प्रकार म्हणून मान्यता पावला आहे. याची कारणे दोन सांगता येतील एक म्हणजे भाषेचा जन्मच काव्यरुपात झाला हे भाषाशास्त्रीय अभ्यासकांनी शोधाअंती काढलेले अनुमान आणि दुसरे म्हणजे कवितेच्या आकृतिबंधात आणि तिच्या मूलभूत घटकात इतर साहित्य प्रकारापेक्षा असलेले पृथकपण.

ज्याप्रमाणे संगीताचे माध्यम स्वर, चित्राचे माध्यम रंग त्याप्रमाणे कवितेचे माध्यम शब्द आहेत; अर्थात गद्य वाङ्मयाचे माध्यमही शब्दच आहेत, तरीही कविता हा एक मूलभूत आणि स्वतंत्र वाङ्मय प्रकार आहे.

कवितेतील नाटयात्मकता, भावाभिव्यक्ती आणि अनुभूती ही शब्दाच्या माध्यमातून आस्वादाच्या पातळीवर जाणवते. इतर वाङ्मयप्रकारातही शब्दाच्या माध्यमातून अनुभव कथन, ज्ञानदान, नाटयात्मकता भावाभिव्यक्ती या गोष्टी आढळतातच त्या आपल्याला ज्ञान व आनंदही देतात. शिवाय या वाङ्मयप्रकारांनाही कवितेसारखी प्रतिभाशक्तीची आवश्यकता असते. असे असूनही इतर वाङ्मयप्रकार आणि कविता यांच्यातील फरक आस्वादाच्या पातळीवर जाणवतो. याचे कारण शब्द हे माध्यम समान असले तरीही, कथात्मकता व नाटयात्मकता या घटकावर कविता निर्मितीच्या वेळी काही संस्कार होतात. त्यामुळे या घटकांची प्रवृत्ती गदयात्मक न रहाता पदयात्मकही होते. कवीची स्वानुभूती व्यक्त करणारी कविता आणि त्या कवितेचा आस्वाद घेताना होणारी वाचकाची मनोवस्था या गोष्टी कवितेच्या बाबतीत विचारात घ्याव्या लागतात.

कविता या संकल्पनेचे आणि सुंदरतेचे अतूट नाते आहे. एखादी सर्वांग सुंदर गद्य कलाकृती जर एखाद्या रसिक वाचकाला खूप आवडली तर तो, 'मी एक सुंदर काव्यच अनुभवत होतो' अशीही प्रतिक्रिया नोंदविण्याची शक्यता आहे. अशावेळी गद्यवाङ्मयकृतीला 'काव्या'ची उपमा देऊन तो काव्य आणि सुंदरता याचेच नाते केवळ आधोरेखित करीत नाहीतर गद्यापेक्षा पद्य हे मनोरम, तरल, हृदयस्पर्शी आणि विशिष्ट

जाणीव जागृत करणारे असते असेच आपले मत आपण व्यक्त करतो.

एखाद्या चित्रकाराने रंग व कुंचल्यातून अप्रतिम चित्र साकारले तर एखादा रसिक, 'हे चित्र म्हणजे एक कविताच आहे असे चित्र पाहताना वाटते' असे म्हणतो. अशावेळीही सौंदर्याला काव्याची उपमा देणे म्हणजेच, कविता ही सुंदर, मनोहरी असते हे मान्य करणे होय. कोणत्याही भावनेचा मर्मस्पर्शी आविष्कार करण्याचे सामर्थ्य कवितेत असते हे मान्य करावेच लागते.

## कविता म्हणजे काय?

विज्ञानामध्ये आपण एखाद्या वस्तूची, घटनेची व्याख्या काटेकोरपणे शब्दबध्द करतो तशी कवितेची व्याख्या करणे अशक्य आहे. विशिष्ट प्रकारच्या शब्दकृती निर्माण करून विशिष्ट पध्दतीने ग्रहण करण्याची खास पध्दती निर्माण झाली आणि विकसित झाली. तिच्यात देश-स्थल-काल संस्कृतीप्रमाणे वेगवेगळे बदल होत गेले. कवितेचे Norms उत्पन्न होत गेले.

कविता ही संकल्पनाच अनेक वैशिष्ट्यांनी भरलेली असल्याने तिच्या सर्वच्या सर्व वैशिष्टयांना सामावून घेणारी आणि तिच्या सर्व पैलूंवर प्रकाश टाकणारी व्याख्या हाती येणे अशक्य आहे. यासंदर्भात दि.पु.चित्रे म्हणतात, "निव्वळ शब्दकृती म्हणजे कविता नव्हे, तर त्या शब्दकृतींचे विशिष्ट संकेतांना अनुसरून केलेले रुपांतर म्हणजे कविता होय. कविता ही भाषेतील भाषा असल्यामुळे कवितेची व्याख्यां शोधणे अवघड जाते."[१]

कविता म्हणजे विशिष्ट पध्दतीने लिहिलेल्या किंवा छापलेल्या शब्दांच्या ओळी, असे म्हणता येणार नाही. कवितेच्या दृश्यरुप आकारापेक्षा कविता आस्वादताना, वाचताना किंवा ऐकताना जो विशिष्ट अनुभव येतो त्या अर्थाने कविता ही कविता म्हणून स्वीकारली जाते. या संदर्भात सुधीर रसाळ म्हणतात, "एखादे लेखन हे कविता आहे की नाही हे वाचकच त्या लेखनाचा जो एक विवक्षित स्वरूपाचा अनुभव येतो त्यावरून ठरवित असतो."[२]

वाचक जेव्हा कविता वाचतो त्यावेळी त्याच्यासमोर कवीच्या स्वानुभवाचे शब्दरुप असते. त्या शब्दसंहितेत कवीचा अनुभव असतो, हे खरे असले तरी तो केवळ

कवीचा अनुभव नसतो तर त्याशिवाय त्या शब्दांना इतरही अनेक अर्थच्छटा असू शकतात. किंबहुना प्रत्येक वाचकाला त्यातून वेगळाच अर्थ लागेल. कवितेबद्दल कवी कुसुमाग्रज म्हणतात, "कविता ज्या घटनेचे वर्णन करते त्या घटनेपलिकडचा कोणताही आशय ती सूचित करते. हा पलिकडचा आशय रसिकांनी शोधायचा असतो. तो पलिकडचा आशय महत्वाचा असला तरी कवितेचा उगम त्या आशयापासून नव्हे तर त्या घटनेपासूनच होत असतो."[३] म्हणजेच कवितेत फक्त कवीचाच अनुभव व्यक्त झालेला असतो असे नाही तर इतरही कवीला अभिप्रेत नसलेले अनुभव त्याच्या कळत-नकळत, शब्दरुप घेऊन अवतरलेले असतात. "स्वतःच्या कवितेचा सांगितलेला, कवीचा स्वतःचा अर्थही चूकीचा असू शकतो..."[४] असे बा.सी.मर्ढेकर म्हणतात.

कविता म्हणजे 'कवीचा अनुभव' किंवा कविता म्हणजे 'वाचकाचा अनुभव' या दोन दृष्टीकोनातून 'कविता म्हणजे काय?' या विचार केला तरीही कवितेचे तिचे स्वतःचे असे स्वतंत्र अस्तित्व उरतेच कारण 'कवीची कविता आणि वाचकाने अर्थ लावलेली कविता' याशिवायही कवितेची स्वतंत्र ओळख आणि अस्तित्व - Independent identity and entity आपल्याला जाणवते. याबाबत सुधीर रसाळ म्हणतात, "कविता ही कवीनिर्मित जरी असली तरी ती कवीपासून विलग असलेली वस्तू आहे. तसेच तिच्या आस्वादात वाचकास विशिष्ट अनुभव जरी येत असला तरी ती वाचकनिरपेक्ष अशी वस्तू आहे."[५]

सुधीर रसाळ यांच्या या मताशी सहमत होता येईल. कारण कवी जेंव्हा एखाद्या अनुभूतीमुळे विशिष्ट भावनानी संपृक्त होतो तेव्हा उत्स्फूर्तपणे कविता निर्माण होते. त्याक्षणी त्याच्या मनात वाचकाचा विचार मुळीच नसतो. तसेच कविता वाचताना वाचक जेव्हा कवितेतील भावभावनांशी तद्रूप पावतो तेव्हा त्याच्या मनात कवीची अनुभूती नसते. त्यावेळी तो कवीच्या जाणिवांपासून, अनुभूतींपासून पूर्णतः अलग असतो. म्हणजेच कविता ही कवीप्रमाणेच वाचकाचीही नसते. ती एक स्वतंत्र वस्तू म्हणून आपले वेगळे अस्तित्व टिकवून रहातेच.

## भावकविता -

कविता या वाङ्मयप्रकाराची विविध रूपे हे काव्याचे एक वैशिष्ट्यच मानावे लागेल. आपल्या संपूर्ण जीवनाला कवितेच्या विविधरुपांनी प्राचीन काळापासून

आजपर्यंत व्यापून टाकले आहे.

कविता या वाङ्मयप्रकाराची विविध रूपे हे काव्याचे एक वैशिष्टयच आहे. महाकाव्यापासून चारोळयापर्यंत कवितेच्या विविधरूपांनी प्राचीन काळापासून आजपर्यंत आपले जीवन व्यापून टाकले आहे. महाकाव्य, खंडकाव्य, आख्यानकाव्य, स्तोत्रे, पोवाडे, पदे, गौळणी, लावणी अशा अनेकविध प्रकारांनी कविता रूप घेते.

आपल्याला भावकवितेचा विचार प्रामुख्याने करावयाचा आहे. कारण ग्रेस हे भाव-कविता करणारे कवी आहेत.

'भावकविता' ही प्रामुख्याने 'गीत' या काव्यप्रकारातून उत्क्रांत झाली असे मानले जाते. प्राचीन काळापासून आजपर्यंत काव्य हे लौकिक आणि अभिजात अशा दोन्ही बाजूंनी सारखे समृध्द आणि परिष्कृत होत गेले. सर्वसामान्य माणसाच्या नित्य जीवनव्यवहारात दीर्घ काव्यापेक्षा स्फुट काव्याचाच अधिक वावर व वापर होतो. आरत्या,स्तोत्रे, भूपाळया, सूक्ते, श्लोक, ओव्या, जात्यावरील ओव्या, सण-उत्सवाची गीते इ. अनेक घरगुती, सामुदायिक प्रसंगातून कविता मानवी जीवनाचा आनंददायी व अविभाज्य अंग बनली. कालौघात मानव समाजाच्या सर्वच संक्रमणात गीत व भावकविता ही कवितेची दोन रुपे लक्षणीयरित्या अबाधित राहिली. कवितेच्या या दोन रुपांना गदयामध्ये तसा योग्य पर्याय सापडला नाही. त्यामुळे हे दोन कविताप्रकार अजूनही लोकप्रिय आहेत.

'भावकविता'Lyric या शब्दाचा 'Oxford Advanced Learners Dictionary मध्ये दिलेला अर्थ 'expressing direct personal feelings तसेच 'Lyric means short poem expressing personal emotions' असा आहे. भावकविता म्हणजे रसात्मक कविता असे म्हटले जाते. 'भावकविता' ही सहजोत्स्फूर्त, उत्कट, तरल, भावतल्लीन असते. कोणत्याही व्यक्तीची उत्कट भावावस्था ही अल्पकाळ टिकणारी असते, साहजिकच त्या भावसमाधीत जन्म घेणारी भावकविता ही लघुरूपच असते. म्हणून भावकविता स्फुटरूपातच आढळते. संवेदनशील मनाच्या भावस्पंदनाचे शब्दरूप म्हणजे भावकविता होय. एखादया अनुभूतीला होणारी भावात्मक प्रतिक्रिया भावकवितेचा उगमबिंदू होय. कवीची भाववृत्ती ही भावकवितेचा प्राणभूत घटक असते. भावकवितेतील उत्कटता तरल भावनात्मकता यामुळे अमूर्त संकल्पनाही शब्दरूपाने मूर्तरूप होतात. याबद्दल रमेश तेंडुलकर म्हणतात, ''या विशिष्ट उत्कटतेचा निदर्शक म्हणून Lyric Intensity असा

स्वतंत्र शब्दप्रयोगच काव्यसमीक्षेत रुढ झालेला आढळेल. भावकवितेच्या या वैशिष्ट्यामुळे 'ऐंद्रिय संवेदनांना' (सेन्स इंप्रेशन्स) विशेष प्राधान्य मिळते. अमूर्त संकल्पनाऐवजी संवेदनांच्या आधारे वस्तुंच्या नैसर्गिक गुणधर्मांशी समरसता पावणे ही या भाववृत्तीची एक सहजप्रेरणा बनून रहाते. अनुभवाच्या 'साक्षात' प्रत्ययाचा ताजेपणा, उत्साह आणि आनंद या भाववृत्तीत भरून राहिलेला असतो. भावकवितेचे हे रूप सर्वस्वी शब्दार्थातून संघटित होत असते.''[६]

'भावकविता' ही कवीच्या भावनांची वाहक असते. तिचा शब्दरूप देह लहान असला तरीही अर्थभावाशय विशाल असू शकतो. म्हणूनच कवितेला अल्पाक्षरबव्हर्थकत्व प्राप्त होते. भावकवितेतील अर्थच्छटा शब्दप्रतिमांतून उलगडत जातात. तिच्यातून कवीचे व्यक्तिमत्व आणि त्याच्या भावसंवेदनांच्या जाणीवांची संपन्नता जाणवते. भावकवितेतील शब्द आणि अर्थ यांच्यात आशयाच्या पातळीवर आणि जाणिवांच्या पातळीवर अनेक अनुबंध असतात. शब्द आणि अर्थ यांच्यात असलेले अनेक पदरी नाते, भावकवितेतून प्रतिमा, नाद, लय आणि साहचरी कल्पना यातून उलगडत जाते आणि त्यामुळे भावकवितेत भावसमृध्दता आणि गहिरेपण येते.

भावकवितेतून अभिव्यक्त होणारा अनुभव कालातीत असतो. तो कालातीत असला तरी त्यात कालसंबध्दता असतेच पण तरीही तो अनुभव कालनिरपेक्ष असतो. या संदर्भात प्रा.वा.ल.कुलकर्णी म्हणतात,''कवितारूपाने व्यक्त होणाऱ्या अनुभवाला प्राप्त होणारे हे थोडेफार कालनिरपेक्ष रूप (टाईमलेसनेस) हे माझ्या दृष्टीने कथेपासून कवितेला वेगळे करणारे असे तिचे महत्वाचे लक्षण आहे.''[७]

भावकवितेत कवी, त्याचे व्यक्तिमत्व, त्याचे व्यक्तिमन, अंतर्मुखता, त्याच्या भावांदलोनांची सूक्ष्मता, तरलता, उत्कटता आणि तीव्रता यांचे प्रतिबिंब दिसते. भावकविता ही गीतातून उत्क्रांत झाली असल्याने तिच्यात 'गेयता' असते. म्हणूनच रमेश तेंडुलकर म्हणतात,''गीत हे भावकवितेचे माहेरचे गोड रुप आहे. तर भावकविता हे गीताचे आपल्या स्वतःच्या घरी स्वतंत्र व्यक्तिमत्वाने मिरविणारे रुप आहे. अधूनमधून कन्या माहेरला यावी तशी एखादी भावकविता 'गीता' चे मनोज्ञ रुप धारण करते - भावकवितेत गीतगुण आणि काव्यगुण सहजतेने एकवटलेले असतात.''[८] भावकविता गेय असली तरीही तिच्यातून भावाशयाची अभिव्यक्ती सूक्ष्म, तरल व व्यक्तिगत होते. त्यामुळे भावकविता ही

कधी वृत्तछंदात बध्द तर कधी मुक्तछंदात आढळते अशा या भावकवितेने मानवाला अनादी काळापासून वेड लावले आहे.

मराठी कवितेने मराठी भाषेच्या प्रारंभापासून सुरू केलेली वाटचाल आजपर्यंत यशस्वीपणे चालू आहे. या प्रदीर्घ प्रवासात, 'मराठी कविता' विविधांगाने बहरली, फुलली आणि समृध्दही झाली. शब्दकळा, अर्थकळा आणि रुपकळा दाखवित ती लावण्यवती झाली. दैवी, पारमार्थिक भक्तिमुक्तीपर, आत्मसुखाय, राष्ट्रहिताय, जनहिताय, भावुक अशा अनेकविध पैलूंनी मराठी कविता संस्कारित, परिष्कृत आणि आविष्कृत झाली. मराठी काव्यप्रांतावर, पाश्चिमात्य कवितेचा प्रभाव पडला आहे हे मान्य केले तरीही मराठी कवितेने 'स्व'त्व कधीच सोडले नाही. उलट पाश्चिमात्य कवितेलाच 'स्व'त्वात रंगवून मराठी कविता स्वतंत्र अस्तित्वाने निर्माण होत राहिली. मराठी कवितेच्या प्रवासाची अनेक वळणे लक्षात घेता कालानुरूप तिचे स्वरूप बदललेले दिसून येते. येथे त्याचा अल्पस्वरूपात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठीतील प्रारंभीची कविता मौखिक रुपात होती. सुमारे ११-१२ व्या शतकात ग्रांथिक वाङ्मय निर्माण झाले. मराठी ग्रंथनिर्मितीचा प्रारंभच काव्यरुपाने झाला असल्याने मराठी कविता ही गद्यापेक्षा निश्चितच अधिक सन्माननीय ठरते. शके ११९० मध्ये आदयकवी मुकुंदराजांनी 'विवेकसिंधु' हा आदयग्रंथ लिहिला. त्यानंतर सुमारे १०० वर्षांनी यादवकाळात मराठी भाषेचा सुवर्णकाळ निर्माण झाला. यादवकाळात महानुभाव पंथाच्या कवी व कवयित्रींनी मराठी वाङ्मय समृध्द केले. मराठी भाषेतील 'आदय कवयित्री' महदंबेने भावपूर्ण 'धवळे' गाऊन शीघ्रकवित्वाचे आणि अल्पाक्षरबव्हर्थकत्वाचे वैशिष्टय दाखवले. भास्करभट्ट बोरीकर, दामोदर पंडित, नरेंद्र, पं.विश्वनाथ रवळोव्यास अशा अनेक महानुभावीय कवींनी काव्यनिर्मिती केली. त्यांची प्रेरणा व हेतू हा ईश्वरभक्ती, कृष्णस्तुती आणि पंथीय प्रसार हाच होता.

ज्ञानेश्वरांनी संस्थापिलेल्या भागवत संप्रदायातील संत, कवी व कवयित्रींच्या काव्यनिर्मितीमागील प्रेरणा व हेतूसुध्दा ईश्वरभक्ती, आत्मोध्दार आणि लोकोध्दार हाच होता. ज्ञानेश्वरांच्या ठायी कवित्व, संतत्व आणि रसिकत्व यांचा त्रिवेणी संगम झाला आहे. ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतील सर्वच संत स्त्री-पुरुषांनी काव्यनिर्मिती केली. महानुभावीय कवी व कवयित्रींनी व वारकरी संप्रदायातील सर्वच संतकवी व कवयित्रींनी

ओवी व अभंग या माध्यमातून काव्यरचना केली. संत नामदेव हे मराठीतील पहिले भावकवी आणि आदयचरित्रकार मानले जातात. जनाबाईनेही भावपूर्ण अभंग रचले. संत सोपानदेव, मुक्ताबाई, नरहरी सोनार, गोरा कुंभार सावतामाळी, चोखामेळा, सेनान्हावी, कर्ममेळा यांनी ही स्फुट अभंगरचना केली.

ज्ञानेश्वरांच्यानंतर सुमारे ३०० वर्षांनी संत एकनाथांनी आपल्या सारगर्भित भाषेने आणि पांडित्यपूर्णतेने मराठी कवितेला समृध्द केले. मराठी कविता त्यांनी विविध दिशेला वळविली. संत एकनाथांच्या दासोपंत, जनीजनार्दन, विठारेणुकानंदन, रामा जनार्दन या एकनाथपंचकाबरोबरच प्रेमदास, सिध्दपाल केसरी, कृष्णदास अशा अनेक कवींनी काव्यरचना केली. संत एकनाथ हे संतकवी आणि पंडितकवी यांच्यातील दुवा आहेत.

एकनाथांच्या नंतर १६ व्या शतकात फादर स्टिफन्स या प्रतिभावंत कवीने 'ख्रिस्तपुराण' देवनागरीत लिहिले.

यानंतर भागवत संप्रदायाच्या मंदिराचा कळसाध्याय संत तुकारामांच्या रूपाने निर्माण झाला. कवी आणि कविता यांची एकरूपता याचे आदर्श उदाहरण म्हणजे तुकारामांचे अभंग होत. यांना समकालीन असलेल्या राष्ट्रसंत रामदासांनी कवितेच्या माध्यमातून धर्मजागरण आणि लोकप्रबोधन केले. त्याच्या रामदासी संप्रदायातच जयराम स्वामी, रंगनाथ स्वामी, केशवस्वामी, आनंदमूर्ती याही संतकवींचा समावेश होतो.

१७ व्या शतकातच मराठी कविता कलाकुसरीत रमली. पंडिती काव्याचा हा १५० ते २०० वर्षांचा कालखंड मुक्तेश्वर, वामनपंडित, रघुनाथपंडित, सामराज, नागेश, विठ्ठल, श्रीधर, मोरोपंत या पंतकवींनी गाजविला.

१८ व्या शतकाच्या प्रारंभी मराठी काव्यात शाहिरी वाङ्मयाचा उगम झाला. लावणी व पोवाडा या दोन काव्यप्रकारांनी बहुजन समाजाचे मनोरंजन केले. या काव्याला 'तंतकाव्य' म्हणून ओळखले जाते. अ.ब.कोल्हटकरांनी शाहिरी वाङ्मयाला 'मराठी काव्याची प्रभात' असे संबोधले आहे. अनंतफंदी, परशुराम, रामजोशी, प्रभाकर, सगनभाऊ , होनाजी बाळा हे शाहिरी वाङ्मयाचे महत्वाचे शिल्पकार होत. पेशवाईच्या अस्ताबरोबरच शाहिरी काव्यही अस्तंगत झाले.

१८१८ ते १८७५ संत,पंत, तंतकाव्याचा प्रवाह क्षीणपणे चालू राहिला.

पण इंग्रजीशिक्षित कवींनी मराठी कवितेला नवे रूप देण्याचा प्रयत्न केला. परशुराम तात्या गोडबोले, कृष्णशास्त्री चिपळूणकर, ग.ह.पटवर्धन, पा.गो.पारखी, कृष्णशास्त्री राजवाडे, राजा टी माधवराव, पांडुरंग व्यंकटेश चिंतामणी पेठकर, म.मो.कुंटे, इ. कवींनी या कालखंडात काव्यरचना केली.

१८७६ ते १८८४ या कालखंडात नवे विचार, बदलती राजकीय सामाजिक परिस्थिती या सर्वांचे प्रतिबिंब मराठी कवितेत आले. या काळात इंग्रजी कवितांची मराठीत खूप भाषांतरे झाली. गीतिकाव्याचे बीजारोपण याच कालखंडात झाले. या कालखंडाला वाङ्मयीन 'तमोयुग' म्हणून संबोधले जात असले तरी या कालखंडात लोकहितवादी आणि महात्मा जोतीराव फुले यांच्यासारख्या परखड विचारवंतांनी साहित्यातून नवविचारांचे प्रकाशकिरण पेरले. जोतीरावांनी मानवताधिष्ठित समता आणि समताधिष्ठित समाज ही जीवनमूल्ये आणि समाजमूल्ये यांचा प्रथम उच्चार केला. आपल्या 'अखंड' काव्यरचनेतून वैचारिक क्रांतीचे सूक्त गायिले. कवितेत सामाजिकता आणून तिला वैचारिक बैठक देण्याचा पहिला प्रयत्न जोतीरावांनीच केला. ही सामाजिकता नंतरच्या काळात केशवसुतांच्या कवितेत आढळते.

१८८५ ते १९२० हा मराठी कवितेचा क्रांतिकाल होय. १८८५ मध्ये केशवसुतांची कविता रसिकांसमोर आली आणि मराठी कवितेत क्रांतिकारी परिवर्तन झाले. केशवसुतांनी मराठी काव्यप्रवाहाला चिंतनपूर्वक नवी दिशा, नवी वाट देण्याचे ऐतिहासिक कार्य केले. त्यांनी कवितेच्या अंतर्बाहय स्वरूपात प्रयोग केले. सुनितरचना मराठीत आणली. मुक्तछंदात रचना करून गण-मात्रांचे बंधन झुगारले. कवी आणि कविता यांच्याकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. कवितेला आत्मनिष्ठ बनवले. आणि कवीला प्रतिष्ठा मिळवून दिली. काव्यविषयात विविधता, वैचित्र्य आणले. सुनितरचना, गूढगुंजनाची प्रवृत्ती, सामाजिक आशय, प्रणयभावनेचे नवे रुप, निसर्गविषयक नवा दृष्टीकोन या गोष्टी केशवसुतांनी मराठी कवितेत आणून तिच्यात आमूलाग्र क्रांती केली. मराठी कवितेत सौंदर्यवाद Romaticism केशवसुतांनीच आणला. याशिवाय मराठी कवितेमध्ये 'गूढता' किंवा 'दुर्बोधते' चा प्रवेश केशवसुतांच्या कवितेपासूनच झाला ही गोष्ट लक्षणीय आहे.

केशवसुतांच्या कवितेने 'केशवसुतसंप्रदाय' निर्माण केला. गोविंदाग्रज,

कवी रेंदाळकर, रे. टिळक, बी इ.चा समावेश त्यात होतो. केशवसुतांच्या समकालीन व त्यानंतरही कवी विनायक, माधवानुज, दत्त, भा.रा.तांबे इ. कवींनी कविता लिहिल्या. १९०५ नंतर मराठी काव्यप्रांत थोडासा अंधारल्यासारखा झाला असे वाटते ना वाटते तोच रविकिरण मंडळाच्या उदयाने मराठी काव्यक्षेत्र प्रकाशमान झाले. रविकिरण मंडळाने मराठी कविताक्षेत्रात महनीय कार्य केले. माधव ज्युलियन, गिरिश, यशवंत, श्री.बा.रानडे, ग.त्र्यं.माडखोलकर, द.ल.गोखले आणि दिवाकर हे या रविकिरण मंडळाचे संस्थापक कवी होते. याच काळात ऐतिहासिक व राष्ट्रीय कवितेचाही प्रवाह निर्माण झाला. कवी गोविंद, दु.आ.तिवारी, अज्ञातवासी, कवी माधव, साने गुरुजी, सावरकर इ. कवी राष्ट्रीय व ऐतिहासिक कवी म्हणून ओळखले जातात. या काळाच्याच समकालीन विडंबनात्मक व विनोदी काव्य उदयास आले. प्र.के.अत्रे, बाळकराम, अनंत काणेकर, दत्तू बांदेकर, गो.ल.आपटे, उपाध्ये, राजा बढे इ.विडंबनपर कविता करणारे कवी होते.

केशवसुत संप्रदाय व रविकिरण मंडळाच्या प्रभावापासून वेगळे राहून काव्यनिर्मिती करणाऱ्या कविमंडळीत श्री.रा.बोराडे, वा.ना.देशपांडे, गु.ह.देशपांडे, ना.घ.देशपांडे, वा.गो.मायदेव, काव्यविहारी, वा.भा.पाठक, सोपानदेव चौधरी, वि.भि.कोलते इ. चा समावेश होतो.

१९३५ नंतर मराठी कवितेला ओहोटी लागली आहे असे वाटत असतानाच तिने नवे प्रतिभासंपन्न आणि समाजाभिमुख वळण घेतले. हे रूप देणाऱ्या कवींमध्ये कवी अनिल, कुसुमाग्रज, वा.रा.कांत, वा.भ.बोरकर, श्रीकृष्ण पोवळे, कृ .प.निकुंभ, वि.म.कुलकर्णी, ना.ग.जोशी इ. कवींचा समावेश होतो. कुसुमाग्रजांच्या कवितेने तर ज्ञानपीठ पारितोषिकाचा सर्वश्रेष्ठ पुरस्कार मिळवला. याच काळात चिं.त्र्यं.खानोलकर यांचीही वेगळेपणाने नजरेत भरणारी कविता निर्माण झाली.

२० व्या शतकाच्या पूर्वार्धात मराठी काव्यक्षेत्रात बा.सी.मर्ढेकर, पु.शि.रेगे आणि शरच्चंद्र मुक्तिबोध या तीन कवींनी आपली अजरामर छाप कवितेवर पाडली. सुमारे १९३९-४५ च्या सुमारास दुसरे महायुध्द झाले. राष्ट्रीय व जागतिक पातळीवर राजकीय, सामाजिक, शैक्षणिक घडामोडी वेगाने घडल्या. यंत्रयुगाचा जन्म, शहरीकरण, औद्योगिक क्रांती आणि दुसरे महायुध्द या सर्वांचा परिणाम मानवी जीवनावर झाला. याच सुमारास सिग्मंड फ्राईड याने मानसशास्त्राची ओळख व व्याप्ती जगाला करून दिली आणि सगळे जग

या विलक्षण, अनोळखी, अद्‌भूत मनोव्यापारांच्या परिचयाने थक्क झाले. या सर्व घटनांचा परिणाम सर्वच संवेदनाशील कविमनावर न झाला तर नवलच. साहजिकच मराठी कवितेतही त्याचे प्रतिबिंब उमटले. मराठी कवितेने याच कालखंडात आणखी एक क्रांतिकारी वळण घेतले. या दुसऱ्या काव्यक्रांतीचे श्रेय बा.सी.मर्ढेकरांकडे जाते. किंबहुना त्यांना 'दुसरे केशवसुत' म्हटले जाते. ऱ्हासशील, रोमँटिक कवितेचे संकेत मोडून मर्ढेकरांनी मराठी कविता खऱ्या अर्थाने आधुनिक केली. 'शिशिरागम'(१९३८) या त्यांच्या पहिल्याच काव्यसंग्रहातील कविता बव्हंशी सौंदर्यवादी आहेत हे लक्षात येते. ते मर्ढेकरांच्याही लक्षात आलेले असावे. आणि म्हणूनच त्याच्या मर्यादाही त्यांनी जाणल्या. झपाट्याने बदललेल्या समाजाचे चित्रण त्यांच्या पुढील 'काही कविता' (१९४७) आणि 'आणखी काही कविता'(१९५१) या दोन संग्रहातून चित्रित झाले. मर्ढेकरांनी आपल्या कवितेत बदललेले अनुभवविश्व, उद्विग्नता, निराशा, कटुसत्याची विदारकता यांचे चित्र साकारले. मर्ढेकरांच्या कवितेतील या स्थित्यंतराला मराठी कवितेच्या इतिहासात महत्वाचे स्थान आहे. यंत्रसंस्कृतीच्या प्रभावाखाली झपाट्याने बदलत चाललेल्या सामाजिक परिस्थितीमुळे दुभंगलेली आधुनिक मानसिकता आणि तिची भयावहता मर्ढेकरांच्या कवितेत प्रकर्षाने व नेमकेपणाने आली. वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक विघटनाच्या प्रक्रियेचे चित्रण प्रथम मर्ढेकरांनीच आपल्या कवितेतून केले. दुसरे महायुध्द, त्यातील भीषण मानवसंहार, अणुबॉम्बची भयानक दाहकता, फ्रॉईड व युंग यांचे मनोवैज्ञानिक शोध, नैतिक मूल्यांचा झालेला लोप आणि या सर्वांमुळे होणारी मानवी मनाची भावनिक ससेहोलपट आणि वैचारिक पेच प्रथम त्यांच्याच कवितेतून आविष्कृत झाले. नवीन आशय, विषय, नव्या उपमा, उपमाने, नवी चमत्कृतीजन्य शब्दनिर्मिती आणि तीव्र, सखोल वेदना कवितेतून शब्दबध्द करताना मर्ढेकरांनी कवितेत नवी क्रांती केली. १९४७ नंतर उदयास आलेल्या शरच्चंद्र मुक्तिबोधांची प्रतिभासंपन्न, सामाजिक आशयाची कविता निर्माण झाली. नवी मळवाट (१९४९) आणि यांत्रिक (१९५७) या कवितासंग्रहातून मुक्तिबोधांनी मराठी रोमँटिक कवितेच्या परंपरेला शह देऊन सामाजिक बांधिलकीची कविता लिहिली आणि आपल्या कवितेची वेगळी वाट व आधुनिकता प्रस्थापित केली. मर्ढेकरांच्या कवितेत प्रकट झालेल्या काही साम्यवादी प्रवृत्तींना त्यांनी आपल्या कवितेत मार्क्सवादी क्रांती विचारांची निश्चित अशी बैठक दिली. हे मुक्तिबोधांचे खास काव्यकर्तृत्वच मानावे लागेल. म्हणूनच त्यांची कविता मराठीतील पहिली महत्वाची राजकीय कविता ठरते. मुक्तिबोधांच्या या

सामाजिक बांधिलकीच्या मार्क्सवादी कवितेची परंपरा विं.दा.करंदीकर आणि नारायण सुर्वे यांनी समर्थपणे चालू ठेवली. पण या तिघांनाही कवितेतून मध्यमवर्गीय समाजघटकांच्या संवेदना, जाणिवा, दुःखे व्यक्त करता आली नाहीत. याच काळात मंगेश पाडगावकर, वसंत बापट, बा.भ.बोरकर, इंदिरा संत यांचीही कविता निर्माण झाली. याच नवकवितेच्या प्रवाहाला विद्रोही दलित कवितेचाही प्रवाह येवून मिळाला. सौंदर्यवादापेक्षा वास्तववादी, अस्तित्ववादी विचार त्यातून अधिकाधिक येऊ लागला. नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, दया पवार, प्रल्हाद चेंदवणकर, फ.मुं.शिंदे, वामन निंबाळकर यांनी विद्रोही कविता लिहिली.

आधुनिक मराठी काव्याचा हा धावता आढावा घेताना असे लक्षात येते की मराठी कवितेचा, -'प्राचीन काव्य ते आजपर्यंतची कविता' - असा हा प्रवास एखादया महाप्रचंड नदीसारखा अखंड प्रवाही, विविधरूपे धारण करणारा आहे. या कालौघात मराठी काव्यसरिता, कधी पारमार्थिक, अध्यात्मिक, कधी तात्विक-उद्बोधक, कधी अवखळ-गंभीर, कधी आत्मसुखाय,कधी बाजारु-रुक्ष, कधी तेजस्वी, कधी राष्ट्रहिताय, कधी निसर्गप्रेमी, कधी भावुक अशा विविध रूपात वहात राहिली. एखादया नदीची, प्रारंभीचा छोटासा खळखळणारा झरा, वेगवान प्रवाह, कोसळणारा प्रपात, गंभीर प्रशांत डोह अशी रुपे असताना चुकून एखादी धार प्रवाहाला सोडून अलग होते आणि आपल्याच नादात वाहू लागते. नेमके असेच कवी ग्रेस यांच्या कवितेबद्दल म्हणता येईल.

**सारांश** - वरीलप्रमाणे या पहिल्या प्रकरणात आपण काव्य म्हणजे काय, भावकविता म्हणजे काय या विषयाच्या अनुषंगाने विचारमंथन केले. ज्या साठोत्तर काळात ग्रेस यांची कविता आपल्या वेगळ्या वाटेने वाटचाल करू लागली, तत्पूर्वीची मराठी कवितेतील वळणेही आपण स्थूलमानाने पाहिली. मराठी कवितेच्या या प्रवाहाबरोबर आपण आता ग्रेस यांच्या कवितेपर्यंत आलो आहोत.

आता आपणास पुढील प्रकरणात ग्रेस यांचा स्थूल जीवनपरिचय करून घ्यावयाचा आहे.

## संदर्भसूची


१) दि.पु.चित्रे : 'कवितेबद्दलचे काही प्रश्न अन् कांही अनुमाने',समाविष्ट ग्रंथ 'मराठी टीका' संपादक : वसंत दावतर, पृष्ठ - १३५

२) सुधीर रसाळ : 'कविता आणि प्रतिमा', पृष्ठ - ७

३) कुसुमाग्रज : 'कविता कुसुमाग्रजांची - कुसुमाग्रजांच्या शब्दात' - ऑडिओ ध्वनीफीत.

४) बा.सी.मर्ढेकर : 'बा.सी.मर्ढेकरांचे पत्र', सत्यकथा मर्ढेकर विशेषांक, मे १९५६, पृष्ठ -३१

५) सुधीर रसाळ : 'कविता आणि प्रतिमा', पृष्ठ -१३

६) रमेश तेंडुलकर : 'साहित्यप्रकार : कविता' समाविष्ट ग्रंथ 'साहित्य : अध्यापन आणि प्रकार' संपादक श्री.पु.भागवत आणि इतर पृष्ठ - १७७, १७८

७) वा.ल.कुलकर्णी : 'साहित्य : स्वरूप आणि समीक्षा' पृष्ठ - १३१.

८) रमेश तेंडुलकर : 'साहित्यप्रकार : कविता' समाविष्ट ग्रंथ 'साहित्य : अध्यापन आणि प्रकार' संपादक श्री.पु.भागवत आणि इतर पृष्ठ - १८२


****